सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७३५६/४९२/४४२/४४३
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक: २/एनजीसी/PCI/नवीन संस्था व प्रवेशक्षमता वाढ/२०२६/ ५५६ दिनांक : 20 JUL 2026

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यात बी.फार्मसी आणि डी.फार्मसी अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करणे व विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशक्षमता वाढ करण्याबाबत..

संदर्भ : १) शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२६/ई १६४९६१५/विशि-५, दि.२५.५.२०२६.
२) शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक मान्यता-२०२६/प्र.क्र.६२५/ई १७४१४११/तांशि-४, दि.९.७.२०२६.

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७६ मधील तरतूदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली, "महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची" बैठक दि. १४ मे, २०२६ रोजी झाली. सदर बैठकीत औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या २०२५-२०३१ करिताच्या बृहतआराखडयास मान्यता देण्यात आली आहे. सदर बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यात बी. फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरू करण्यात येऊ नयेत तसेच विद्यमान संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशक्षमता वाढविण्यात येऊ नये, असा निर्णय झालेला आहे. (सोबत प्रत संलग्न)

उपरोक्त बाब विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थांमधील बी. फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश क्षमता वाढ तसेच बी. फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देता येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

( डॉ. प्रमोद नाईक )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी-
१. कुलसचिव, सर्व संबंधित विद्यापीठे. २. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई.
३. सर्व औषधनिर्माणशास्त्र संस्था.
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
५. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.



महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२१,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi५.hted-mh@mah.gov.in

---

क्र. संकीर्ण-२०२६/ई-१६४९६१५/विशि-५ दिनांक : २५ मे २०२६

**विषय :** महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या दिनांक १४/०५/२०२६ रोजी मंत्रिमंडळ सभागृह, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची बैठक दिनांक १४/०५/२०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीचे इतिवृत्त माहिती व उचित कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

(प्रताप पां. लुबाळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:

१) मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उपमुख्यमंत्री (राउशु, क्रिडा) सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

४) मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ), तथा उपाध्यक्ष. महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा. मंत्री ( महसूल ), मंत्रालय, मुंबई, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६) मा. मंत्री ( वैद्यकीय शिक्षण ) तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

७) मा. मंत्री ( उद्योग ) तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

८) मा. मंत्री, ( कौशल्य विकास ) तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

९) मा. राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण), तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१०) मा. श्री. अतुल भातखळकर, विधानसभा सदस्य तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मंत्रालय, मुंबई.

११) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मंत्रालय, मुंबई.

१२) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मंत्रालय, मुंबई.

१३) अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मंत्रालय, मुंबई.

१४) प्रधान सचिव, उद्योग विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मंत्रालय, मुंबई.

१५) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मंत्रालय, मुंबई.

१६) सचिव, नियोजन विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मंत्रालय,

१७) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मंत्रालय, मुंबई.

१८) कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड.

१९) कुलगुरू, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई.

२०) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग तथा प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान, माळा नं.१८, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई.

२१) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, पुणे.

२२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय तथा सदस्य महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मुंबई.

२३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तथा सदस्य, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मुंबई

२४) सहसचिव, विद्यापीठ अनुदान आयोगाचे पश्चिम क्षेत्रिय कार्यालय तथा सदस्य महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग, मुंबई

२५) सह सचिव ( तंत्र शिक्षण), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

२६) सह सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई

२७) उप सचिव (महाविद्यालय शिक्षण), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

२८) निवडनस्ती - विशि-५.

विषय — महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या दिनांक १४/०५/२०२६ रोजी मंत्रिमंडळ सभागृह, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७६ मधील तरतुदीनुसार, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची बैठक दिनांक १४ मे २०२६ रोजी दुपारी ०१:३० वाजता मंत्रिमंडळ सभागृह, सातवा मजला, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. उपस्थित मान्यवरांची यादी सोबत जोडली आहे.

सदर बैठकीत मांडण्यात आलेल्या खालील नमुद विषयांवर मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत-

| विषय | मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले निर्देश | कार्यवाही करणारा विभाग | कालावधी |
|---|---|---|---|
| १] कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अखत्यारीतील रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ यांच्या बृहत आराखडा प्रस्तावाबाबत | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अखत्यारीतील रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने सादर केलेल्या सन २०२४ ते सन २०२९ पर्यंतच्या ०५ वर्षाच्या बृहत आराखड्यास मंजुरी देण्यात येत आहे.<br><br>सदर बृहत आराखडयातील नमूद बिंदूवर नियमानुसार संलग्नता देताना गुणवत्ता राखली जाईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.<br><br>तसेच संलग्नता देण्याबाबतच्या नियमावली (SOP), शिखर परिषदा व शासनाच्या निकषांची पूर्तता करणा-या संस्थांनाच संलग्नता देण्यात यावी. निकषांच्या पूर्ततेच्या अधिन राहून कोणत्याही संस्थेस संलग्नता देण्यात येऊ नये. याकरीता आवश्यक असणारी जमीन, वर्गखोल्या, प्रयोगशाळा इत्यादी बाबत | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | १ महिना |

| | | | |
|---|---|---|---|
| | युजीसी व तत्सम संस्थांचे निकषांप्रमाणे कार्यवाही करावी.<br><br>कौशल्य केंद्र व कौशल्य विद्यापीठ मान्यता प्राप्त संस्थांना संलग्नता देत असताना संबंधित राज्य सार्वजनिक विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक राहील. | | |
| २] डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखडयाच्या प्रस्तावाबाबत | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या बृहतआराखडयात नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासुन गडचिरोली, नंदुरबार, हिंगोली, वाशिम, धाराशीव, सिंधुदुर्ग व परभणी या आदिवासी, डोंगराळ व दुर्गम ७ जिल्हयांत प्राधान्याने अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, बी. व्होक. अभ्यासक्रमाची १७ महाविद्यालये सुरु करण्यास मान्यता देण्यात यावी.<br><br>मात्र शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिल्यास त्या संस्थांची तपासणी करुनच मान्यता देण्यात यावी. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (तांशि-२) | १ महिना |
| ३] औषधनिर्माण शास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रस्तावित बृहत आराखडा प्रस्तावाबाबत | औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या प्रस्तावित बृहतआराखडा २०२५-२०३१ चे सादरीकरण केलेल्या बृहतआराखडयास मान्यता देण्यात येत आहे.<br><br>शै. वर्ष २०२६-२७ पासून शै. वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यात नवीन बी.फार्मसी आणि डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या संस्था सुरू करण्यात येऊ नयेत तसेच विद्यमान संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशक्षमता वाढविण्यात येऊ नये. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (तांशि-४) | १ महिना |

| | | | |
|---|---|---|---|
| | डी.फार्मसी व बी.फार्मसी अभ्यासक्रमांमध्ये शिकविणारे शिक्षकच एम.फार्मसी/ फार्म.डी. या अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत नाहीत याची खात्री विभागामार्फत करण्यात यावी.<br><br>केंद्रशासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. १४.१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय मान्यता देण्यात येत नसल्याचे कळविल्यानुसार अंमलबजावणी करण्यात यावी. | | |
| ४] सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पारंपारिक महाविद्यालयांमध्ये "समाजकार्य" अशी स्वतंत्र विद्याशाखा सुरू करण्यास मान्यता देणे/नवीन समाजकार्य महाविद्यालयांना मान्यता देणेबाबत | नवीन समाजकार्य महाविद्यालये स्थापन न करण्याबाबतचा यापुर्वीचा मंत्रिमंडळाचा निर्णय विचारात घेवून आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बहुविद्याशाखीय शिक्षणाचे )Multidisciplinary Education) महत्व विचारात घेता, सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार "समाजकार्य" अशी स्वतंत्र विद्याशाखा सुरू करणेबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (मशि-४) | १ महिना |
| आयत्यावेळी आलेला विषय-<br><br>५] शिवाई एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल ट्रस्ट, अमरावती या संस्थेस -अमरावती॰ या बिंदूसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता इरादापत्र मंजूर करणेबाबत. | माहेडच्या दिनांक १४.०५.२०२६ रोजीच्या बैठकीत सन २०२४-२९ या सम्यक योजनेत (Perspective Plan) -अमरावती (शहर), ता. जि. अमरावती या अतिरिक्त बिंदूस (बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी) सन २०२६-२७ साठी मान्यता देण्यात येत आहे. सदर बिंदूकरिता शिवाई एज्युकेशनल सोशल अँड मेडिकल ट्रस्ट, अमरावती या संस्थेच्या प्राप्त प्रस्तावाची तपासणी करून इरादापत्र देणेबाबतचा प्रस्ताव सक्षम | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (मशि-४) | १ महिना |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्राधिकारी यांच्या मान्यतेसाठी सादर करावा. | | |
| आयत्यावेळी आलेला विषय-<br>६] मेरीटाईम व डीप ओशनोग्राफी युनिव्हर्सिटी बाबत. | मेरीटाईम व डीप ओशनोग्राफी युनिव्हर्सिटी मधील काही अभ्यासक्रम राज्य सार्वजनिक विद्यापीठांमध्ये सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच अशी विद्यापीठे राज्यात सुरू करण्याबाबत विभागाने तपासावे. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग (विशि-३/४) | --- |
| ७] डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे संबंधी बैठकीत उपस्थित झालेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू यांनी पुढीलप्रमाणे माहिती सादर केली:-<br>अ) सदर विद्यापीठामध्ये कौशल्याधारित अभ्यासक्रम राबविण्यावर भर देण्यात येतो.<br>आ) सध्याच्या सर्व प्रलंबित परीक्षांचे निकाल येत्या दोन महिन्यांत पूर्ण करण्यात येतील. तसेच पुढील शैक्षणिक सत्रापासून ३० दिवसांत निकाल जाहीर करण्याची दक्षता घेण्यात येईल.<br>इ) महाराष्ट्रातील सर्व राज्य सार्वजनिक | पुढील कार्यवाही करावी. | कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे. | २ महिने |

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यापीठांनी आपापल्या परिसरात DBATU उपकेंद्रांसाठी भूखंड वाटपास अनुकूलता दर्शवली असून त्यासंबंधीची औपचारिक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या उपकेंद्रांच्या बांधकामास लवकरच प्रारंभ होणार असून त्याद्वारे DBATU चा विस्तार राज्यभर होऊन तांत्रिक शिक्षणाचे विकेंद्रीकरण होईल. | | | |

**मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील**
**महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची बैठक**
**दिनांक :- १४ मे २०२६** रोजी - १:३० वाजता
**(स्थळ -** मंत्रीमंडळ सभागृह, सातवा मजला मंत्रालय, मुंबई**)**

| अ.क्र. | बैठकीस उपस्थित असलेले सन्माननीय सदस्य/अधिकारी |
|---|---|
| १. | मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) |
| २. | मा. उप मुख्यमंत्री (रा. उ. शु व क्रिडा) |
| ३. | मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण |
| ४. | मा.मंत्री, महसूल |
| ५. | मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण |
| ६. | मा.मंत्री, उद्योग विभाग |
| ७. | मा.मंत्री, कौ. रो. उ व नाविन्यता विभाग |
| ८. | मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण |
| ९. | श्री. ओमप्रकाश गुप्ता , अ. मु. स. वित्त विभाग |
| १०. | श्री. वेणु गोपाल रेड्डी, अ. मु. स. उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| ११. | श्री. नविन सोना प्रधान सचिव, मा. उपमुख्यमंत्री कार्यालय (नगर विकास) |
| १२. | डॉ. राजेश देशमुख, सचिव, मा. उपमुख्यमंत्री कार्यालय (रा.उ.शु.) |

| | |
|---|---|
| १३. | श्रीमती शैला ए., सचिव, नियोजन विभाग |
| १४. | डॉ. रजनीश कामत, कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड |
| १५. | डॉ. अपुर्वा पालकर, कुलगुरू, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई |
| १६. | डॉ. बी. एन. पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी, माहेड तथा राज्य प्रकल्प संचालक, रूसा |
| १७. | डॉ. विनोद मोहितकर, संचालक, उच्च तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई |
| १८. | डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च  शिक्षण संचालनालय, पुणे |
| १९. | श्री. संतोष पुनमचंद खोरगडे, सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| २०. | श्री. रविंद्र गुरव, सह सचिव, कौ. रो. उ व नाविन्यता विभाग |
| २१. | श्री. प्रताप लुबाळ, उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| २२. | श्री. अशोक शंकर मांडे, उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| २३. | श्रीमती मंजुषा कारंडे, उप सचिव, कौ. रो. उ व नाविन्यता विभाग |
| २४. | डॉ. पल्लवी सापळे, संचालक (अ.का) डी.एम. ई. आर |
| २५. | डॉ. श्रीकांत पाटील, सी. ई. ओ, (एम. एस. आय.एन. एस.) |

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

था मजला ४, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई .०३२ ४०० -

दूरध्वनी क्र.०२२०४०९३५. Email ID: tashi4-hted@mah.gov.in

क्र.मान्यता-२०२६/प्र.क्र.६२५/ई-१७४१४११/तांशि-४ दिनांक : ०९ जुलै, २०२६.

ई-मेलद्वारे

प्रति,

संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यात नवीन बी.फार्मसी आणि डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या संस्थांना द्यावयाच्या विविध मान्यतांबाबत...

संदर्भ:- आपले पत्र क्र.२/मान्यता/फार्मसी संस्था परवानगी/२०२६/२९७, दि.२६.०५.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्रान्वये आपण औषधनिर्माणशास्त्र संस्थांच्या विविध मान्यतेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७६ मधील तरतुदीनुसार मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची बैठक दि.१४.०५.२०२६ रोजी झाली. सदर बैठकीत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२५ ते २०३१ करिताच्या बृहत आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यात नवीन बी.फार्मसी आणि डी.फार्मसी संस्था सुरु करण्यात येऊ नयेत, तसेच, विद्यमान संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता वाढविण्यात येऊ नये, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, संदर्भाधीन प्रस्तावातील प्रपत्र-अ, प्रपत्र-ब तसेच, प्रपत्र-क मध्ये नमूद औषधनिर्माणशास्त्र संस्थांना अनुक्रमे बी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, विद्यमान संस्थेत नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे तसेच, नवीन डी.फार्मसी संस्था सुरु करणे याकरिता शासन मान्यता देता येणार नाही. तरी, सदर बाब तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्तरावरुन परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही तात्काळ करावी, ही विनंती.

आपला,

(अनिल चौरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती (तांशि-४)